**प्रेसनोट** **दिनांक १९/०८/२०१९.**

## विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणेशहर.

## दुखापतीच्या गुन्हयातील पाहीजे असलेला आरोपी पोलीसांच्या ताब्यांत.

दिनांक-१७/०८/२०१९ रोजी २२-०० वाजताचे सुमारांस फिर्यादी सुभाष सोनबा रसाळ, वय-६० वर्षे, राहणार-४५९, सदाशिव पेठ,पुणे, हे अलका टॉकीज चौक, शास्त्री रोड,पुणे येथील त्यांचे मुलाचे न्यु सायली बेकरी, दुकानाचे बाहेर उभे असतांना पोलीस रेकॉर्डवरील गुंड नामे गौतम प्रकाश परदेशी, वय-३५ वर्षे, राहणार-भारती भवनचे पाठीमागे, १३/१४ जोशी वाडा सदाशिव पेठ पुणे हा तेथे आला असतांना फिर्यादी यांनी त्यास त्याचे पुर्वीचे बेकरीतुन माल घेतलेल्या उधारीच्या पैशांबाबत विचारण्यास सुरुवात केली असता त्याने फिर्यादी यांना शिवीगाळ करुन फिर्यादी यांचे डोक्यात बियरची बाटली मारुन त्यांना जखमी करुन तेथुन पळुन गेलेबाबत विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर येथे गुन्हा नोंद क्रमांक-२९७/२०१९, भा.दं.वि.सं.कलम ३२४, ५०४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यांत आलेला होता.

माननीय स्वप्ना गोरे मॅडम, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, व माननीय श्री.सुधाकर चव्हाण, सहाय्यक पोलीस आयुक्त, विश्रामबाग विभाग,पुणेशहर यांचे मार्गदर्शनाखाली व विश्रामबाग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.दादासाहेब चुडाप्पा यांचे अधिपत्याखाली व तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक श्री.विजय जाधव यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक बाबा दांगडे, पोलीस शिपाई संजय बनसोडे व प्रशांत शिंदे हे पोलीस ठाणेचे हद्दीत वाहन चोरी गुन्हयास प्रतिबंध आणि पाहिजे असलेल्या आरोपींचा शोध घेण्याचे अनुषंगाने पेट्रोलिंग फिरत असतांना त्यांना जोशी वाडा, सदाशिव पेठ पुणे येथे वरनमुद गुन्हयातील पाहिजे असलेला आरोपी नामे गौतम प्रकाश परदेशी, वय-३५ वर्षे, राहणार-भारती भवनचे पाठीमागे, १३/१४ जोशी वाडा सदाशिव पेठ पुणे हा मिळुन आल्याने त्यास ताब्यांत घेवुन त्यास दिनांक १८/०८/२०१९ रोजी सदर गुन्हयाचे तपासकामी २०.५६ वा. अटक करुन वरनमुद गुन्हा उघडकींस आणुन उल्लेखनिय कामगिरी केलेली आहे.

(दादासाहेब चुडाप्पा )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर